RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# बाल शिक्षण हक्क कायदा 2009 ची अंमलबजावणीची सद्यःस्थिती

**श्री. महादेव दिनकर कांबळे,**
वरिष्ठ लिपिक
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

## प्रस्तावना

देशाच्या व राज्याच्या विकासाठी मानव साधन संपत्तीचे योगदान महत्त्वाचे असते व अशा महत्त्वपूर्ण मानव साधन संपत्तीचा विकास हा शिक्षणाचा प्रमुख उद्दिष्टे आहे. प्राथमिक शिक्षण हे मानवी साधन संपत्तीचे पहिले पाऊल आहे. प्राथमिक शिक्षणामध्ये व्यक्तिमत्व अभिवृत्ती, सामाजिक जाणीव, विविध कौशल्याच्या चांगल्या सवयी इ. बाबीचा पाया घातला जातो व विविध मूल्ये रुजवली जातात. त्यातून लहान मुलांचा प्राथमिक अवस्थेत विकास घडून येतो.

## प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व

आपल्या देशात शिक्षणावर ७० टक्के खर्च केला जातो. व्यक्तिचा विकास हा शिक्षणामुळे होतो. त्यामुळे शिक्षणाला मानवी जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणाची पहिली पायरी म्हणजे प्राथमिक शिक्षण हे होय. प्राथमिक शिक्षणामध्ये इयत्ता पहिली ते आठवी या वर्गाचा प्राथमिक शिक्षणात समावेश करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षणात बालकांचे वय ६ ते १४ वर्ष वया पर्यंत ठरविण्यात आलेले आहे. तसेच बालकांचा सर्वांगिण विकास हा प्राथमिक शिक्षणामध्ये होत असतो. त्यामुळे राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून १० वर्षाच्या आत व १४ वर्षा पर्यंतच्या सर्व मुला–मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था राज्य करील असे मार्गदर्शक तत्व घटनेच्या कलम ४५ मध्ये विहित करण्यात आले आहे.

या मार्गदर्शक तत्वाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून 86 व्या घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटनेत ' २१ क ' हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. राज्य सरकार ६ ते १४ वर्ष वया पर्यंतच्या मुला–मुलींना कायदयाने ठरविल्यानुसार शिक्षण देईल अशी तरतुद करण्यात आली आहे.

बालकांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या काळात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले होते. यावरुन बालकांचा विकास हा प्राथमिक शिक्षणावर अवलंबून आहे त्यामुळे बाल शिक्षण हक्क कायदा अंमलात आणला जात आहे. या पार्श्वभूमीवर मोफत व सक्तीचे शिक्षण हा आता ६ ते १४ वर्ष वयोगटातील बालकांचा मूलभूत हक्क ठरला असून राज्याची ती जबाबदारी ठरली आहे.

प्राथमिक शाळेत बालकांना घालण्यासाठी काही वेळा मुलांच्या आई–वडीलांची आर्थिक परिस्थिती नसते. म्हणून राज्याने मध्यान्ह भोजन, मुलींना दैंनदिन हजर राहणेसाठी १ रु. उपस्थिती भत्ता इ. उपाय योजना राज्य सरकार करते. प्राथमिक शिक्षणामध्ये व्यक्तीचा विकास घडून आला तर राज्याचा विकास व देशाचा विकास घडून येईल. त्यामुळे आपल्या देशातील निरक्षरतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. यातून राष्ट्र विकास घडून येईल. म्हणूनच बाल –

शिक्षण हक्क कायदा २००9 संसदने संमत केला आणि तो १ एप्रिल २०१० पासून तो अंमलात आणला गेला.

प्राथमिक शिक्षणावर बालकांचा व त्यांच्या कुंटुंबाचा अर्थिक विकास होण्यास मदत होणार आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामुळे देशातील व राज्यातील दारिद्रय कमी होईल. राष्ट्रीय एकात्मतेची

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

भावना निर्माण होऊन राष्ट्राचा विकास घडून येईल. यासाठी प्राथमिक शिक्षण मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

## बाल शिक्षण हक्क कायदयातील तरतुदी

## मोफत प्राथमिक शिक्षण मिळण्याची तरतुद

१. ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना जवळच्या सरकारी शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत इयत्ता पहिली ते आठवी मोफत शिक्षण मिळण्याची हक्क आहे.

२. या जवळच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण मिळण्याच्या हक्कात लिंग, धर्म, वर्ग, जात यांचे भेद न मानता सर्व मुलांचा समावेश केला गेला. त्यामध्ये शारीरिकदृष्टया व इतर अंपग मुलांचा समावेश आहे.

३. राज्य सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्था जेथे गरज आहे. तेथे सरकारी शाळा उभारतील त्यामध्ये अंतर व मर्यादा आणि निकष राज्य सरकार आणि स्थानिक शैक्षणिक संस्था ठरवतील.

## जवळच्या शाळेचे अंतर महाराष्ट्र राज्य नियमात नमूद केलेले आहे.त्याचे अंतर पुढील प्रमाणे

१. राज्य सरकारी आणि स्थानिक शैक्षणिक संस्था इ. पहिली ते पाचवी च्या वर्गा करीता १ कि.मी. परिसरात व इ. पाचवी ते आठवी च्या वर्गा करीता 3 कि.मी. शाळा उपलब्ध करुन दिली पाहिजे व त्यासाठी कोणत्याही प्रकारची देणगी घेतली जाणार नाही. राज्य सरकार कडून त्यांचा दैंनदिन खर्च भागवला जाईल व सरकारी अनुदानित शाळांना मोफत शिक्षण दिले पाहिजे. मोफत शिक्षण मिळणा—या शाळेत या मुलांचे प्रमाण २५ टक्के पेक्षा कमी नसावे.

२. पालक आपल्या मुलांना जवळच्या मोफत सरकारी शाळेऐवजी इतर शाळेत पाठविण्याचे ठरवू शकतात.

३. खाजगी व विशिष्ट वर्गा करिता नमूद केलेल्या शाळेत प्रवेश घेणा—या एकूण मुलापैकी २५ टक्के मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण

## बालकांच्या मोफत व सक्तीचे शिक्षणामध्ये खाजगी शाळेमध्ये २५ टक्के आरक्षण

बाल शिक्षण हक्क कायदयाच्या २५ टक्के राखीव जागांच्या तरतुदीप्रमाणे आर्थिक व सामाजिक प्रतिकूल परिस्थितीतील मुले, त्याप्रमाणे अंपग यांना प्राथमिक स्तरावर खाजगी, विना—अनुदानित व अल्प अनुदानित शाळा तसेच केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय व सैनिक शाळा अशा विशिष्ट वर्गवारीतल्या शाळातून प्रवेश मिळेल. आर्थिक व सामाजिकदृष्टया मागासेलेल्या मुलांना मोफत शिक्षण व पाठयपुस्तके आणि इतर सुविधा मिळतील या २५ टक्के राखीव जागाच्या तरतुदीत अनुदानित शाळा, मदरसे, वेदिक शाळा, पाठशाळा, धर्माचे शिक्षण देणा—या शाळा, निवासी शाळा, अनाथलये यांना वगळण्यात आले आहे.

## प्राथमिक शाळेत प्रवेश मिळण्याकरिता देणगी किंवा मुलाखत देण्याची आवश्यकता नाही.

१. शाळेत प्रवेश घेण्याकरिता पालकांना व मुलांना मुलाखती किंवा चाचणीला तसेच पडताळणीला तसेच कोणत्याही प्रकारची देणगी भरावी लागणार नाही.

२. अटी व नियमाचा भंग करणा—या शाळेला मोठा दंडाला सामोरे जावे लागेल.

३. वयाच्या दाखल्यासाठी प्रवेश नाकारला जाणार नाही. वयाचे अधिकृत पुराव्याचे कागदपत्र देई पर्यंत मुलांना शाळेत प्रवेश मिळावा.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

## वयाने मोठया असलेल्या मुलांना व बदली होऊन आलेल्या मुलांना शाळेत प्रवेश मिळण्याची तरतुदी

१. मुलगा पा़त्र वयापेक्षा मोठा असेल व तो शाळेत कधीच गेला नसेल तर त्याला प्रवेश नाकारला जाऊ नये.

२. या मुलाला त्याच्या वयाच्या अनुरुप इयत्ते प्रवेश दिला पाहिजे. इतर मुलांची पात्रता येण्या करिता त्याचे विशेष प्रशिक्षण शाळेच्या तासा व्यतिरिक जादा तास घेऊन शिकवणी दिली पाहिजे.

३. शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसेल तर त्या शाळेतील मुलांना सरकारी अनुदानित शाळेत बदली करुन मिळण्याचा हक्क आहे.

४. राज्यातील व राज्याबाहेरील सरकारी अगर सरकारी अनुदानित शाळेत बदली करुन मिळण्याचा हक्क आहे.

## गुणवत्ता पूर्ण शिक्षण

१. प्रत्येक खाजगी शाळेत अनेक तरतुदी पुर्तता दि. १ एप्रिल २०१३ पर्यंत करावी लागणार आहे. २०१५ पर्यंत शैक्षणिकदृष्टया पात्र असावी. विशिष्ट वर्गाकरिता तरतुद करावी.

२.शिक्षक भरती गुणवत्तापूर्ण केली पाहिजे. अर्धवेळ काम करणारे शिक्षक यांची भरती केली जाऊ नये.

३. इयत्ता पहिली ते पाचवी वर्गाकरिता २०० कामाचे दिवस ८०० शिकविण्याचे तास.

४. इयत्ता सहावी ते आठवी वर्गाकरिता २४० कामाचे दिवस १००० शिकविण्याचे तास.

५. इयत्ता पहिली ते पाचवी वर्गाकरिता 30 विद्यार्थी करता १ शिक्षक नियुक्ती

६. इयत्ता सहावी ते आठवी वर्गाकरिता ३५ विद्यार्थी करता १ शिक्षक नियुक्ती

७. कनिष्ठ प्राथमिक वर्गाकरिता १५० पेक्षा विद्यार्थीसंख्या १ मुख्याध्यापक उच्च प्राथमिक वर्गात गणित व शास्त्र विषयाचे शिक्षक पाहिजे.

शाळेचे मूल्यमापन झाले पाहिजे. त्याचा अहवाल जनते समोर मांडणे इ. अनेक तरतुदी मोफत शिक्षणाविषयी करण्यात आलेल्या आहेत.

## अंमलबजावणीची सद्यःस्थिती

आपल्या देशात बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क २००9 लागू दि. १ एप्रिल २०१३ रोजी तीन वर्षे पूर्ण होत आहे. देशाच्या ़त्रुटीकडे लक्ष वेधून मुदतबंद कार्यक्रम या कायदयाने ठरविला आहे. राष्ट्रीय बाल शिक्षण हक्क कायदा आयोगाचे असे प्रतिपादन आहे की, कायदयातील तरतुदी अनेक आघाडयावरची अंमलबजावणी संथ आहे. देशातील सर्व मुला—मुलींना समान दर्जाचे व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साकार करण्याकरीता केंद्र व राज्य सरकारने तातडीने प्राधान्यक्रम दिला पाहिजे. आज रोजी 80 लाख मुले शाळेबाहेर आहेत. ही शाळा सोडलेली आणि कधीही शाळेत न गेलेली, बालमजूर, रस्त्यावरची मुले, स्थलांतरित मुले, वादग्रस्त परिसरातील मुले, अपंग मुले, दुर्लक्षित व प्रतिकूल परिस्थितीमुळे अशा मुलांना शिक्षण प्रवाहात सामील करून घेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरच बाल शिक्षण हक्क कायदयाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीला गती येईल, यासाठी राज्य सरकारला अधिक प्रयत्न करावे लागतील.

तसेच शिक्षकांची पदे, मूलभूत सुविधा व प्रशासकीय बदल करण्यात आले आहेत. हे सरकारचे प्रयत्न तुटपुंजे आहेत. त्याच्यांत गुणात्मक दर्जा व ठामपणाची गरज आहे. मुलभूत सुविधा व शिक्षकांची उपलब्धता याबाबत १० टक्केहून कमी शाळा बाल शिक्षण हक्क कायदयाच्या तरतुदीच्या अंमलबजावणी चौकटीत बसायची आहे. ही वस्तुस्थिती या कायदयाच्या अंमलबजावणीवर प्रकाश टाकणारी आहे. या कामा करिता पुरेसा निधी उपलब्ध असणे, खाजगी

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

शिक्षण संस्थावर नियंत्रण ठेवणे, कार्यपद्धतीत पारदर्शकता, समस्याची दखल घेणे, अवघड गोष्टीकडे प्रत्यक्षात लक्ष दिले गेले नाही. आपल्या देशातील लाखो मुलांना शिक्षण देण्याची बांधिलकी केंद्र व राज्य सरकारच्या पायात अडकली आहे.

## उपाय योजना

१. बाल शिक्षण हक्क कायदयाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी पुरेशा प्रमाणात आर्थिक पाठबळ मिळविणे.
२. खाजगी शाळेवर नियंत्रण ठवणे.
३. शिक्षक भरती करणे.
४. शिक्षक प्रशिक्षण संस्थाची गुणवत्ता सुधारणे.
५. पारदर्शक कार्यपद्धती निर्माण करणे.
६. समस्या दखल घेणारी यंत्रणा उभारणे.
७. कठीण विषय संदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

## समारोप

अशा प्रकारे आपण बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायदा 2009 नुसार आपण देशात केलेल्या उपाय योजना व कायदयाची तरतुदी आणि प्रत्यक्षात केली जाणारी अंमलबजावणी यांच्यामध्ये तफावत असून आजही काही शाळेत एक शिक्षक शाळा चालवित असल्याचे पहावयास मिळते, तसेच काही ठिकाणी शाळेसाठी मूलभूत सुविधा किंवा शाळेसाठी इमारत, क्रीडांगण, स्वच्छतागृहे इ. सोयीचा अभाव आहे. तसेच आपल्या देशातील ८० लाख बालके शाळेबाहेर आहेत. सर्व गोष्टीची अंमलबजावणी त्वरीत झाली तरच बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क कायदा यशस्वी झाला असे म्हणणे योग्य होईल. त्यासाठी प्राथमिक शिक्षण देणे महत्वाचे आहे. त्यामुळे बालकांच्या विविध कौशल्याचा विकास होण्यास मदत होईल व राष्ट्राचा विकास घडून येईल.

## संदर्भ

1. प्रा. व्ही. बी. पाटील, **मानवी हक्क** – ( २०१० ), पुणे, के. सागर पब्लिकेशन, प्रकाशन वर्ष – 2010.
2. प्रा. व्ही. बी. पाटील, **भारताची राज्यघटना** – ( २०१० ), पुणे. के. सागर पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती.
3. इंटरनेट साईट – http://www.rtemaharashtra.org/marathi/